ग्रामीण/नागरी सहकारी ग्राहक संस्थांना भागभांडवली अंशदान या योजनेच्या लेखाशिर्षातील गौणशीर्षात बदल करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१८८/२४ स

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०८ मार्च, २०१८.

वाचा :-

१. शासन निर्णय, सहकार व वस्त्रोद्योग विभाग,
क्रमांक ग्राहक १०९२/बजेट/प्र.क्र.२३२/२४ सी, दिनांक ३०/५/१९९४
२. शासन निर्णय, सहकार व वस्त्रोद्योग विभाग,
क्रमांक ग्राहक १०९२/बजेट/प्र.क्र.२३२/२४ सी, दिनांक १४/३/१९९५
३. शासन निर्णय,सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
क्रमांक सपस१००७/प्र.क्र.१०८/२४ स, दिनांक २६/१२/२००७
४. महालेखापाल कार्यालय, मुंबई यांचे क्र. ख.वि/चा-१/सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग/युओआर-१०५/२०१७-१८/९१५, दिनांक १३/२/२०१८ चे पत्र

प्रस्तावना:-

केंद्र पुरस्कृत योजनेखाली केंद्र शासनाकडून ग्राहक सहकारी संस्थांना नागरी भागात ग्राहक संस्थांमार्फत “डिपार्टमेंटल स्टोर्स उघडणे, ग्राहक संस्थांच्या शाखा उघडणे, तसेच राष्ट्रीय सहकारी विकास निगम योजनेअंतर्गत ग्रामीण भागात जीवनोपयोगी वस्तूंचे वितरण करणे” यासाठी भागभांडवल, कर्ज व अनुदान या स्वरुपात अर्थसहाय्य मिळत होते. सदर योजना केंद्र शासनाने दिनांक १ एप्रिल, १९९२ पासून बंद करुन राज्य शासनाकडे हस्तांतरीत केली. ग्राहकांना जीवनोपयोगी वस्तू रास्त भावात मिळण्यासाठी त्याचप्रमाणे उत्पादकांना त्यांनी उत्पादित केलेल्या ग्राहकोपयोगी उत्पादनांना योग्य भाव मिळण्यासाठी व ग्राहक संस्थामुळे बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होणे इ. सर्व महत्वाच्या बाबींचा विचार करुन सदर योजना राज्यस्तरावर राबविण्याचा शासनाने सन १९९४-९५ मध्ये निर्णय घेतला. त्याप्रमाणे नागरी क्षेत्रातील मध्यवर्ती / प्राथमिक ग्राहक सहकारी संस्थांच्या अर्थसहाय्याबाबतचे आदेश शासन निर्णय, दिनांक ३० मे, १९९४ च्या अन्वये निर्गमित करण्यात आले. याच धर्तीवर ग्रामीण भागातील ग्राहक सहकारी संस्थांच्या अर्थसहाय्याबाबतचे आदेश शासन निर्णय, दिनांक १४.०३.१९९५ अन्वये निर्गमित झाले. सदर योजना आता पूर्णपणे राज्यशासनाच्या निधीतून राबविण्यात येत आहे. सदर योजनांच्या लेखाशिर्षातील गौणशिर्षामध्ये बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

ग्रामीण/नागरी सहकारी ग्राहक संस्थांना भागभांडवली अंशदान या योजनेच्या लेखाशिर्षातील गौणशीर्षात खाली नमूद केल्याप्रमाणे बदल करण्यात येत आहेत:-

मराठी

मागणी क्रमांक व्ही-३
५४७५ इतर सर्वसाधारण आर्थिक सेवांवरील भांडवली खर्च

अ.क्र.	च्या ऐवजी	असे वाचावे
I	५४७५ १०२-नागरी पुरवठा (०१) ग्राहक सोसायट्या (०१)(१३) ग्रामीण सहकारी संस्थांना भागभांडवली अंशदान(५४७५०१३२)	५४७५ १९५ ग्रामीण सहकारी संस्थांमध्ये गुंतवणूक (०१) ग्राहक सोसायटया (०१)(०१) ग्रामीण सहकारी संस्थांना भागभांडवली अंशदान (५४७५०१३२)
II	५४७५ १०२-नागरी पुरवठा (०१) ग्राहक सोसायट्या (०१)(१४) नागरी सहकारी संस्थांना भागभांडवली अंशदान (५४७५०१४१)	५४७५ १९५ ग्रामीण सहकारी संस्थांमध्ये गुंतवणूक (०१) ग्राहक सोसायटया (०१)(०२) नागरी सहकारी संस्थांना भागभांडवली अंशदान (५४७५०१४१)

English

Demand No.3
5475 Capital Outlay on Other General Economic Services

Sr. No.	For	Read
I	5475 102- Civil Supplies (01) Consumer Societies (01)(13) Share Capital Contribution to the Rural Co-operative Consumer's Societies(5475 0132)	5475 195 Investment in Co-operatives (01) Consumer Societies (01)(01) Share Capital Contribution to the Rural Co-operative Consumer's Societies (5475 0132)
II	5475 102-Civil Supplies (01) Consumer Societies (01)(14) Share Capital Contribution to the Urban Co-operative Consumer's Societies(5475 0141)	5475 195 Investment in Co-operatives (01)) Consumer Societies (01)(02) Share Capital Contribution to the Urban Co-operative Consumer's Societies (5475 0141)

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांचा अनौपचारीक संदर्भ क्र. ४८५/१७/व्यय-२, दिनांक ३१/१०/२०१७ अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा २०१८०३१२११५२१९०९०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sunanda M Ghadyale

Digitally signed by Sunanda M Ghadyale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-operation, Marketing And Textiles Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fd89208cbc27b202c96467165ac5bc9643515d80ba9edecaf650dad6e8311b45, serialNumber=c5adff2513f33afa9ed70c79c5a4636204d8bb4040bf2c6c2470d0f20d8dc79d, cn=Sunanda M Ghadyale
Date: 2018.03.12 11:59:20 +05'30'

(सुनंदा मो.घड्याळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. महालेखाकार, महाराष्ट्र- १,(लेखा व अनुज्ञेयता),(लेखापरिक्षा), मुंबई/ नागपूर.
२. अपर मुख्य सचिव(पणन) सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय,मुंबई
३. सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था,पुणे
४. पणन संचालक,महाराष्ट्र राज्य,पुणे
५. सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था
६. अधिदान व लेखा अधिकारी , मुंबई
७. निवासी लेखापरिक्षा अधिकारी,मुंबई
८. सहसंचालक,लेखा व कोषागारे,संगणक कक्ष,नवीन प्रशासन भवन,मंत्रायल,मुंबई
९. मा.मंत्री(पणन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
१०. मा.राज्य मंत्री(पणन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
११. वित्त विभाग, व्यय-२/अर्थसंकल्प -३ व १३ ,मंत्रालय, मुंबई
१२. अवर सचिव (कार्यासन १७ स), सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. कार्यासन अधिकारी,(रोख शाखा)सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई (३ प्रती)
१४. निवड नस्ती (२४स).